**श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील मराठी, हिंदी व इंग्रजी विभाग व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन केंद्र, छ. संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन:**

दिनांक ०७ ऑक्टोबर २०२४ रोजी करण्यात आले. याप्रसंगी उदघाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे मा. राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य, प्रा.डॉ.गजानन सानप, बीजभाषक म्हणून सचिव, श्रीकृष्ण जन्मभूमी मुक्ती न्यास, मथुरा येथील मा. सुदर्शन महाराज कपाटे उपस्थित राहिले. यावेळी प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांची प्रमुख उपस्थिती होती. तर उदघाट्न सत्राच्या अध्यक्षस्थानी पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव, मा. श्री निवृत्ती गावंडे उपस्थित राहिले. उदघाटक म्हणून बोलत असताना डॉ. सानप म्हणाले की, भारतीय ज्ञान परंपरा ही, संस्कृती संवर्धन व उत्कर्ष करणारी आहे. भारतीय ज्ञान परंपरा -सण व उत्सवातील वैज्ञानिक दृष्टीकोन आपणांस जाणून घेता आला पाहिजे. तसेच जुन्या विविध प्रथांमध्ये मोठ्याप्रमाणावर वैज्ञानिक दृष्टीकोन दडलेला आहे. हे सांगत असताना त्यांनी नागीलीच्या पानाच्या विड्याचा संदर्भ दिला. प्रत्येक भारतीय प्रथांमध्ये ज्ञानात्मक संशोधन दडलेले आहे. याचे आपण सर्वांनी संशोधन करून ते ज्ञान पुढील पिढीपर्यंत कसे आणून ठेवता येईल याचा विचार करावा. असे मत प्रतिपादन केले. बीजभाषक म्हणून बोलत असताना मा. सुदर्शन महाराज कपाटे म्हणाले की, भारतीय ज्ञान परंपरा ही अतिप्राचीन अशी आहे. हे ज्ञान विविध संप्रदायात मुळातच आहे. त्यापैकी महानुभाव संप्रदायाच्या अनुषंगाने महाराजांनी विवेचन केले. त्यांनी म्हाइंभटाचे उदाहरण देऊन ज्ञान आणि अहंकार याबद्दल विवेचन केले. पुढे त्यांनी भारतीय ज्ञान परंपरेच्या उज्जवल भविष्याविषयी आपले चिंतन मांडले. अध्यक्षीय समारोप संस्थेचे सचिव, मा. श्री निवृत्ती गावंडे यांनी केला.

यावेळी परिसरातील काही महाविद्यालयांच्या भाषा विभागांशी संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य व विभागप्रमुख यांच्या स्वाक्षरीनिशी समजस्य (MOU) करार करण्यात आला. यासोबतच प्रस्तुत महाविद्यालयातील प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ यांच्या 'संत साहित्य : सामाजिक विचारांची मूल्यदृष्टी' या संपादकीय पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

चर्चासत्राच्या पहिल्या सत्रात 'भारतीय ज्ञान परंपरा' या विषयाच्या अनुषंगाने प्रमुख वक्ते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील हिंदी विभागातील प्रा.डॉ.भारती गोरे व छ. शाहू महाविद्यालय, लासूर स्टेशन येथील मराठी विभागप्रमुख, प्रा. डॉ. नरसिंह कदम महाराज उपस्थित होते. डॉ. भारती गोरे यांनी भारतीय ज्ञान परंपरा -सण व उत्सवातील वैज्ञानिक दृष्टीकोन विस्तृतपणे मांडला. तसेच डॉ.नरसिंह कदम यांनी ज्ञान कसे प्रत्येक बाबींमध्ये भरलेले आहे. त्याच्याकडे ज्ञानात्मक मानस ठेवून आपण पाहिले पाहिजे. कीर्तन परंपरा आणि काल्याचे कीर्तन यामागे कोणता विचार दडलेला आहे. यासंदर्भनिही विचार मंथन झाले. चर्चासत्राच्या तिसऱ्या सत्रात संबंधित चर्चासत्राच्या विषयाच्या अनुषंगाने विविध महाविद्यालयातील विध्यार्थ्यांची वक्तृत्व स्पर्धा ठेवण्यात आली. यावेळी आठ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. यात अनुक्रमे
प्रथम - अश्विनी वनारसे - MGM विद्यापीठ
द्वितीय - श्रुती जहागिरदार - MP Law College
तृतीय - प्रथमेश गिरी - MP Law college
यांनी यश संपादन केले.

या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून राज्य शिक्षण प्रशिक्षण संस्था, जालना येथील प्रा. डॉ. प्रमोद कुमावत व शारदा मंदिर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका, डॉ. सविता मुळे यांनी उपस्थित सर्व प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी यांना मार्गदर्शन केले.

संबंधित राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोप सत्रात प्रमुख वक्ते म्हणून बोलत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी भाषा मंडळाचे अध्यक्ष, प्रा. डॉ. सर्जेराव जिगे यांनी भारतीय ज्ञान परंपरेच्या अनुषंगाने विविध पैलुंचे संदर्भ देत वैज्ञानिक दृष्टीकोन मांडला. तर अध्यक्षीय समारोप पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे संचालक, प्राचार्य, डॉ. प्रदीप जब्दे यांनी केला. बोलत असताना डॉ. जब्दे म्हणाले की, भारतीय ज्ञान परंपरा आणि भाषा तसेच व्याकरण किती महत्वाचे आहे. हे सांगितले. तसेच रामायण, महाभारत या ग्रंथांमधील संदर्भ देत भारतीय ज्ञान परंपरेची पाळेमुळे येथे सापडतील फक्त ती आपणांस शोधण्याची गरज आहे. असे मत व्यक्त केले.

या राष्ट्रीय चर्चासत्रासाठी एकूण १०६ प्राध्यापक, अभ्यासकांनी नोंदणी केली. व त्यांची उपस्थिती होती.

चर्चासत्राचे सूत्रसंचालन व मान्यवरांचे आभार प्रा. डॉ. अश्विन रांजणीकर यांनी मानले. चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. राजश्री पवार, प्रा. डॉ. दत्तात्रय येडले, प्रा. डॉ. सुरेश मुंढे, प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ, श्री विनोद तुपे, श्री रत्नाकर जाधव यांनी प्रयत्न केले.



Deep Prajwalan & Pratima Pujan by the auspicious hand of dignitaries. Shri. Nirutti Gawande, Secretary, Pt. Deendayal Updhayay Education Society, Dr. Gajanan Sanap, Shri. Chainaya Maharaj Kapate, Dr. Subhash Takle & Dr. Ashwin Ranjanikar




Dr. Dattatraya Yedle felicitating Inaugurator Dr. Gajanan Sanap & other dignitaries on the dais.



Dignitaries and faculty members participated in the conference. Prof. Dr. Satish Patil, Prof. Dr. Subhash Bagal, Senator Adv. Arvind Kendre and faculty members.